# गणेश प्रार्थना

तुज मागतो मी आता | मज द्यावे एकदंता || तुझे ठायी माझी भक्ति | विरुढावी गणपती ||

तुझे ठायी ज्याची प्रीती | त्याची घडावी संगती || धरणीधरा ऐसे द्यावे | सर्वांभूती लीन व्हावे ||

तुज शरण शरण | आलो पतित मी जाण || तुझा अपराधी मी खरा | आहे इक्षुचापधरा ||

माझी येऊ दे करुणा | तुजलागी गजानना || नाम घ्या रे मोरयाचे | तरी सार्थक जीवाचे ||

कलीयुगी नामाविण | अन्य उपाय नसे जाण || नामे बहुत तरले | पुनःजन्मासी न आले ||

धरणीधरा मज द्यावे | नित्य नामचि वदवावे ||